# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.
## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| ०४।०५।२०२२ | सभेचे कोरम पूर्ण झाल्याने मिटींगला सुरुवात करण्यात आली. संस्थेचे सचिव जगदिश पाटील यांनी आपल्या सर्व सभासद बंधु-भगिनी चे स्वागत केले. संचालक मंडळाना व्यासपिठावर येण्यास विनंती करत मान्यवरांचे स्वागत केले व सभेचे पुढील सुत्र संचालन हाती घेत मा.सभापती साहेब यांच्या अध्यक्षतेखाली स्थान श्री.प्रविण धनवंतराव पवार यांना स्विकारण्यास विनंती करत सभेला सुरुवात केली. आपल्या कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे ता. जि. धुळे ची विधीमंडळाची (वार्षिक सर्वसाधारण सभा) ५१ वी वार्षिक सभेस सन २०२१-२०२२ या सभेसाठी आपण सर्वजण उपस्थित राहिल्यात आपले सर्वांचे संस्थेच्या वतीने सचिव म्हणुन मनपूर्वक स्वागत! स्वागत! स्वागत! भारत मातेच्या रक्षणासाठी सीमेवर, जे भारतीय वीर जवान शहीद झाले त्या जवानांना तसेच देशातील थोर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, साहित्यीक, शेतकरी बांधव, उद्योगभूषण, शिक्षणतज्ञ, कृषितज्ञ, व संस्थेचे सभासद या त्यांचे नातेवाईक तसेच कृषि विभागात काम करणारे कर्मचारी काळाच्या पडद्याआड गेले. तसेच आपल्या संस्थेचे सभापती साहेब यांचे मोठे बंधु कै. अनंतराव धनवंतराव पवार त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहेत. ही सभा त्यांच्या दुःखात सहभागी आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना!<br>॥ॐ पूर्णमदः पूर्णमिदं, पूर्णात्पूर्णमुदच्यते, पूर्णस्य पूर्णमादाय, पूर्णमेवावशिष्यते॥<br>ॐ.शांती: शान्ती। शांती:<br>मा. सभापती साहेब यांनी प्रास्तविक केलेत. | | |
| (१) | मागिल सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे. | मागिल सभा दिनांक:- २६।०५।२०२१ रोजी वार:- रविवारी सकाळी ठिक ९:०० वाजता व्यंकटेश लॉन्स, [illegible] बाग, [illegible], धुळे सभापती सो. श्री प्रविण धनवंतराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. संस्थेचे सचिव श्री जगदिश पाटील यांनी १ ते ८ विषयाचे वाचन केले ते योग्य व बरोबर आहेत. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | सर्व सभासदांनी मंजुर केला.<br>सुचक :- श्री मुकेश भाईदास सोनवणे<br>अनुमोदक :- श्री प्रविण ओंकार राजपुत<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास. |
| | (२) सन २०२१-२०२२ चा अहवाल, तेरिजपत्रक, नफा-तोटा, ताळेबंदसह मंजुरी देणे. | आपल्या संस्थेचे संचालक श्री मनोज रामभाऊ खैरनार यांनी सभेपुढे सन २०२१-२०२२ चा अहवाल, तेरिजपत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सविस्तर रित्या वाचुन दाखविले सर्व पत्रकांची मांडणी करतांना त्यांनी सभेला आवर्जुन सांगितले आपली संस्था यावर्षीही चांगल्या पध्दतीने कामकाज करत आहे त्यामुळे आपल्या संस्थेला नफा चांगला मिळालेला आहे. सभेने मंजुर केले व कायम केले.<br>असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक :- श्री शरद सोमनाथ बोरसे<br>अनुमोदक :- श्री भरत भास्करराव अहिरराव<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| | (३) अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देवुन सन २०२२-२०२३ ची अंदाजपत्रकास मंजुरी देणे. | आपल्या संस्थेच्या संचालिका श्रीमती प्रभावती भरत पाटील यांनी अंदाज पत्रकाचे वाचन सभेपुढे करुन दाखविले त्यात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेला खर्च नाही. तसेच सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रकाची मांडणी सभेपुढे केली त्यास सभेने मंजुरी दिली कायम केले.<br>असे सर्वानुमते ठरले. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | सुचक :- श्रीमती दिपाली मधु पाटील<br>अनुमोदक :- श्रीमती शुभांगी रामकृष्ण पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| | लेखा परिक्षण | |
| (४) | सन २०२१-२०२२ तपासणी अहवाल त्यावरील पुर्तता अहवाल वाचुन मंजुर करणेबाबत. | आपल्या संस्थेचे व्यवस्थापक श्री मनोज रामभाऊ खैरनार यांनी विषयाची सविस्तर मांडणी करुन सन ०१।०४।२०२१ ते ३१।०३।२०२२ या वर्षाचा तपासणी अहवालाचे वाचन केले व त्या अहवालातील शकाची पुर्ततासाठी प्रमाणित लेखा परिक्षक श्री धनंजय माधवराव पाटील यांनी लेखा परिक्षण तपासणी अहवालातील भाग 'अ' 'ब' 'क' शकाची पुर्तता दिनांक :- २५।०६।२०२२ च्या मा. मिटींग विषय ठराव नं ६ अन्वये जा.क्र. १८६।२०२२-२३ दि. ने 'ओ' नमुन्यात कलम ८२।८७ अन्वये हिशोबातील दोष सुधारण्यासंबंधीचे तपासणी शक दुरुस्ती रिपोर्टस प्रतिवृत्तास मान्यता देण्यासाठी मा. विभागीय सहनिबंधक सो. सहकारी संस्था, नाशिक व मा. जिल्हा उपनिबंधक सो. सहकारी संस्था, धुळे व मा. जिल्हा विशेष लेखा-परिक्षण वर्ग-१ धुळे यांना मंजुरीसाठी पाठविला आहे. त्यास सभेने मंजुर केले. कायम केले.<br>असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक :- श्री चंद्रशेखर देविदास साठे<br>अनुमोदक :- श्री पांडुरंग सोनु अहिरे<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| ५. | समितीने केलेल्या नफा वाटणी बाबत विचार करणे. | आपल्या संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिपकुमार देसले यांनी आर्थिक वर्षाची नफा |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | वाटणी समितीने उपविधी क्रं.४.ग-३/१ या प्रमाणे:- |
| | | मागील शिल्लक नफा :- ७९८८.७५/- |
| | | दि.३१/०३/२०२२ नफा :- ९,५७,००४.५०/- |
| | | एकुण नफा :- ९,६४,९९३.२५/- |
| | | राखीव निधी उपविधी नियम ४३(१)प्रमाणे २५% = २४१,२४८/- |
| | | दि.३१/०३/२०२२ शेअर ४-१/३ रु.७०,८४,६५०/- (८% लाभांश) = ५,६६,७७२/- |
| | | बोनस(अधिकाऱ्यांना) उपविधी अधिनियम १९६५ नुसार = २२,०००/- |
| | | प्रशिक्षण निधी = १५०००/- |
| | | एकुण = ८,४५,०२०.००/- |
| | | शिल्लक नफा = १,१९,९७३.२५/- |
| | | एकुण नफा = ९,६४,९९३.२५/- |
| | | वरील प्रमाणे नफा वाटणी केल्यावर शिल्लक असलेला नफा रु.१,१९,९७३.२५/- या नफ्यातुन सभासदांना भेटवस्तू देण्यात यावी व या ~~भेटवस्तू~~ भेटवस्तू ठरविणे आणि भेटवस्तू खरेदी करणे हा निर्णय घेण्याचा अधिकार मा.सभापती व संचालक मंडळ यांना देण्यात आला आहे. त्यांनी मासिक मिटिंगमध्ये भेटवस्तू ठरवुन खरेदी करणे. यास सभेने मंजुर केले आहे. असे सर्वानुमते ठरले. |
| | | सुचक:- श्री भरत भास्करराव अहिरराव |
| | | अनुमोदक:- श्री शिवराज धनराज माळी |
| | | ठराव सर्वानुमते मंजुर |
| | | सर्वानुमते पास |
| | ६. वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे. | सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखा-परिक्षण करण्याकरिता दोन लेखापरिक्षकांचे अर्ज आलेले आहेत ते खालील प्रमाणे : संस्थेच्या सभापती श्री प्रविण धनवंतराव पवार यांनी विषयाची मांडणी केली. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | (१) श्री छब्बुलाल रामदास पाटील<br>(२) श्री प्रदिप शंकरराव जगताप<br>वरील अर्जांपैकी श्री छब्बुलाल रामदास पाटील प्रमाणित लेखापरिक्षक धुळे यांची सन 2022-2023 या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकरिता लेखापरिक्षक म्हणुन नियुक्ती करण्यात यावी. तसेच त्यांना कळविण्यात यावे व त्यांचे संमती पत्र घ्यावे आणि लेखापरिक्षण झाल्यानंतर नियमानुसार त्यांची फि अदा करण्यात यावी.<br>असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक :- श्री सतिश नथ्थु कोळकर<br>अनुमोदक :- श्री चंद्रशेखर दविदास साठे<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास। |
| ८. | सेवानिवृत्ती सभासदांचा सत्कार करणे. | आपल्या संस्थेच्या संचालिका श्रीमती प्रभावती भरत पाटील यांनी सेवानिवृत्त सभासद सत्कार समारंभ प्रसंगी सुत्र संचालन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री एस. डी. मालपुरे साहेब उपविभागीय कृषि अधिकारी धुळे आणि प्रमुख पाहुणे म्हणुन श्री रमेश भिवसन पोतदार साहेब (सेवानिवृत्त) मा. सभापती कृषि खाते सेवक सह. पतसंस्था धुळे. यांची उपस्थीती लाभली.<br>श्री एस. डी. मालपुरे साहेब यांचा सत्कार सभापती श्री प्रविण धनवंतराव पवार साहेब यांनी शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देवुन केला.<br>श्री. रमेश भिवसन पोतदार साहेब यांचा सत्कार उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार दसरे यांनी |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | तसेच श्री. चंद्रशेखर डी. साठे साहेब यांचा सत्कार |
| | | संचालक श्री मनोज रामभाऊ खैरनार यांनी शाल, |
| | | श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | ☆ सेवानिवृत्त सभासदाचा सत्कार |
| | | (१) श्री प्रताप भिला पाटिल सेवानिवृत्त कृषि पर्यवेक्षक शिंदखेडा |
| | | यांचा सत्कार श्री. एस.डी. मालपुरे साहेब यांनी शाल, |
| | | श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | (२) श्री हरून बशिर पटेल सेवानिवृत्त कृषि अधिकारी मालेगाव |
| | | यांचा सत्कार श्री रमेश भिवसन पोसदार साहेब यांनी |
| | | शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | (३) श्री ज्ञानेश्वर गोरख देवरे सेवानिवृत्त कृषि सहायक यांचा |
| | | सत्कार श्री एस.डी. मालपुरे साहेब यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ |
| | | देवुन सत्कार केला. |
| | | (४) श्री विश्वास जिवन महाले सेवानिवृत्त कृषि सहाय्यक जे.कि. |
| | | कि.प्रयोगशाळा, धुळे. यांचा सत्कार सभापती श्री प्रविण |
| | | यशवंतराव पवार साहेब यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ |
| | | देवुन सत्कार केला. |
| | | (५) श्री सुभाष देवराम कोळी सेवानिवृत्त वाहन चालक |
| | | तालुका शिरपुर यांचा सत्कार संचालक श्री. प्रताप भिला |
| | | पाटिल यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला. |
| | | ☆ सेवानिवृत्त मनोगत |
| | | आपल्या संस्थेचे सभासद श्री मुकेश भाईदास सोनवणे |
| | | यांनी सर्व सेवानिवृत्त सभासदाचे पुढील आयुष्य |
| | | हे सुखाचे, समाधानाचे तसेच आरोग्य निरोगी |
| | | रहिल असे जावो अश्या शुभेच्छा दिल्यात. |
| | | तसेच संस्थेचे सभासद श्री शिवराम धनराज |
| | | माळी यांनी देखील सर्व सेवानिवृत्त |
| | | सभासदाचे आरोग्य निरोगी राहोत तसेच. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | पुढील आयुष्यात सुख, समृद्धी, आनंदमय भरभराटीचे जावो अश्या शुभेच्छा दिल्यात. पुढील सूत्र श्रीमती प्रभापती भरत पाटील यांनी हाती घेतले. यांनी सर्व सेवानिवृत्त सभासदांना संस्थेच्या वतीने सेवानिवृत्त जिवनाच्या शुभेच्छा दिल्या. आणि प्रमुख पाहुणे श्री रमेश भिमसन पोतदार साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले.<br>तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष:- श्री एस. डी. मालपुरे साहेब यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार देसले यांनी सर्वांचे आभार मानिलेत.<br>असे सर्वानुमते ठरले.<br>सुचक:- श्री मधुकर सुका सोनवणे<br>अनुमोदक:- श्री चेतनकुमार हिम्मतराव शिरसाठ<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास |
| | ८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे. | |
| | (अ) आपल्या संस्थेच्या वर्गणी व्याजदर द.सा.द.शे. ६ ट. वरुन द.सा.द.शे. पुन. करणे बाबत विचार विनिमय करणे | आपल्या संस्थेच्या मंजुर उपविधिमधील नियम क्रमांक : क ५.४ मध्ये वर्गणी वरील व्याज हे द.सा.द.शे. ६ ट. असे नमुद आहे. त्यानुसार आज रोजी दि. ०४/०९/२०२२ च्या झालेल्या वार्षिक सर्वसाधारण/अधिमंडळाच्या सभेत या वर्गणी वरील व्याजदर द.सा.द.शे. ६ ट. वरुन व्याजदर हा कमी करुन. |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
|---|---|---|
| | | दसा.द.शे प्र.न. ठरविण्यात आलेला आहे.<br>वा. वर्गणी वरील दसा.द.शे प्र.न. व्याजदर दि.०१०४२०२२ पासुन लागू करण्यात यावा. असे सर्वानुमते ठरले<br>सुचक:- श्री. शिवराज धनराज माळी.<br>अनुमोदक:- श्री मुकेश भाईदास सोनवणे.<br>ठराव सर्वानुमते मंजुर<br>सर्वानुमते पास. |
| | | आपल्या कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ 'क' मधील तरतुदीनुसार सभासद सहकारी शिक्षण व प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे यांचे धुळे जिल्हा सहकारी बोर्ड मर्यादित, धुळे यांच्या कडून सहकार प्रशिक्षक म्हणुन श्री अशोक वाघ साहेब जिल्हा सहकार विकास अधिकारी यांनी सर्व सभासदांना अधिनियम १९६० चे कलम २४ 'क' (१) प्रशिक्षण दिले.<br>श्री. मुकेश सोनवणे साहेब यांनी दिलेली सुचना वार्षिक अहवाल श्रध्दांजली मध्ये शेतकरी नाव असावे. |
| | | आपल्या संस्थेच्या उपसभापती श्रीमती मनिषा दिलीपकुमार देसले मॅडम यांनी आभार प्रदर्शन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, सर्व सेवानिवृत्त सत्कारमूर्ती सहकार बोर्ड प्रशिक्षक, ज्यांनी सभेसाठी |

# कृषी खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित धुळे.

## जनरल सभेचे प्रोसिडींग बुक

| तारीख | विषय | ठराव |
| --- | --- | --- |
| | | हॉल उपलब्ध करुन दिला व्यंकटेश लॉन्स, |
| | | सुरुची नास्ता दिला दोन केटरर्स, साउंड सिस्टिम |
| | | आणि उपस्थित सर्व सभासद बंधू आणि |
| | | भगीनी यांचे आभार मानले. |
| | | शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रीय गित, |
| | | जन-गण-मन ने करुन कार्यक्रम संपला |
| | | असे जाहिर केले. |

वाचले व पाहिले
(सी.आर.पाटील)
प्रमाणित लेखा परिक्षक
सहकारी संस्था, धुळे.
[illegible]/28
नं. १०७३७.

चिटणीस

सभापती

कृषि खाते सेवक सहकारी पतसंस्था मर्या. धुळे